# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,
# मतदारांना सूचना

१) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणूकीचे मतदान पसंतीक्रमाने अंकात नोंद करण्याचे आहेत. उदा. उमेदवाराच्या नावासमोर मराठी १, २, ३, ४, ५ . . . किंवा इंग्रजी 1, 2, 3, 4, 5 . . . यापैकी एकाच भाषेतील अंकात नोंद करावेत.

२) एका मतपत्रिकेवर दोन्ही भाषेमध्ये मत नोंदणी केल्यास ती मतपत्रिका अवैध (बाद) ठरविण्यात येईल.

३) उमेदवाराच्या नावासमोर पसंतीक्रमांकाचे मत नोंदणीसाठी मतपत्रिकेवर दिलेल्या चौकोनामध्येच आपले मत नोंद करण्याचे आहे. निळया शाईच्या पेनने पसंती क्रमांक नोंद करावे.

४) मतपत्रिकेवर पसंतीचा क्रमांक १ नोंद केलाच पाहिजे.

५) मतपत्रिकेवर पसंतीचा क्रमांक १ एकापेक्षा अधिक उमेदवारांना नोंद करण्यात येवू नये.

६) मतपत्रिकेवर क्रमांकाशिवाय इतर कोणतीही खूण नोंद करु नये. उदा. (१), १), x, -, ①, √ अशा प्रकारच्या खूणा करु नयेत.

७) मतपत्रिकेवर खाडाखोड करु नये. तसेच मतपत्रिकेवर नोंद केलेला पसंतीक्रमांक बदलू नये. मत बाद होवू नये याची दक्षता घ्यावी. मागणी केल्यास बाद मतपत्रिका बदलून देण्यात येईल.

८) मतपत्रिकेवर अंकात मत नोंद करताना अंकाच्या अगोदर ० (शून्य) नमूद करु नये उदा. ०१, ०२ अशी नोंद केल्यास मतपत्रिका बाद होईल.

९) मतपत्रिकेवर असलेल्या प्रत्येक उमेदवारास पसंतीचा क्रमांक अनुक्रमाने नोंद करण्याचा हक्क मतदारास आहे.

१०) मतदाराने मतपत्रिकेवर सही करु नये.

११) विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्यापरिषद व अभ्यासमंडळे या अधिकारमंडळाच्या निवडणूका **गुरुवार, दि.२९ सप्टेंबर, २०२२ रोजी** सोळा मतदान केंद्रावर घेण्यात येणार आहेत.

१२) मतदानाची वेळ सकाळी ०९:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत आहे. अंतिम वेळेनंतर येणाऱ्या मतदारास मतदान करता येणार नाही.

१३) मतदारांनी ओळखीसाठी आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, नोकरी करीत असलेल्या कार्यालयाचे ओळखपत्र, शासकीय मतदान कार्ड, पॅनकार्ड, नावबदल केला असल्यास शासन राजपत्र किंवा लग्नपत्रिका मतदानावेळी घेऊन येणे बंधनकारक आहे. यातील कोणतेच ओळखपत्र नसल्यास मतदान करता येणार नाही.

१४) विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मतदान केंद्रावरच मतदारांना मतदान करता येईल.

१५) मतदान केंद्रानुसार मतदार याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. सर्व मतदार याद्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१६) मतदाराने स्वखर्चाने मतदान केंद्रावर मतदानासाठी येण्याचे आहे.

१७) पदवीधर मतदारांनी मतदार नोंदणी अर्जात नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. पदवीधरांच्या मागणीनुसारच त्यांना मतदानकेंद्रे दिलेली आहेत.

१८) मतदारांना मतदानावेळी कोणतीही आवश्यक माहिती पाहिजे असल्यास सदरची माहिती केंद्राध्यक्षाकडून घ्यावी.

१९) ज्या निवडणूकीसाठी मतदारांना मतपत्रिकेचा बंच एकत्रित देण्यात येईल. त्यामध्ये मतदाराने प्रत्येक मतपत्रिकेवर आपले पसंती क्रमांकाचे मत स्वतंत्रपणे नमूद करण्याचे आहे. प्रत्येक मतपत्रिकेवर पसंतीचा क्रमांक अंकात १ नमूद करुन पुढील पसंतीच्या उमेदवारास पसंतीक्रमांक नोंद करण्यात यावा.

२०) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र परिसरात संपूर्ण शांतता राखावी व नियमांचे पालन करावे.

२१) मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारच्या उमेदवाराचा प्रचार करता येणार नाही.

२२) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणूकीची मतदान प्रक्रिया ही खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत पार पाडून विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

२८/१/२२

कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी